Order
Verified, Read and recorded

Dt.16/04/2026 R.D.Shinde
JMFC, Radhanagari

RAJENDRA DHANAJI SHINDE Digitally signed by RAJENDRA DHANAJI SHINDE Date: 2026.04.16 17:24:48 +0530

Alongwith Exh.1

SCC No.28/2026

समरी क्रि.केस नं. /२०२४

**राधानगरी येथील मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसो, यांचे कोर्टात**

**स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा : राधानगरी** ... फिर्यादी
विरुध्द
**श्री. अमित शिवाजी चौगले** ... आरोपी

**व्हेरिफिकेशन**

मी यातील फिर्यादी बँकेतर्फे अधिकृत मॅनेजर श्री. अक्षय दत्ताराम फतजी , व.व. ३१, व्यवसाय : नोकरी, रा. राधानगरी, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,

फिर्यादी बँक ही कॉर्पोरेट बँक असून, ती स्टेट बँक ऑफ इंडिया ॲक्ट १९५५ प्रमाणे नोंदणीकृत बँक आहे. फिर्यादी बँकेचे मुख्य कार्यालय मुंबई या ठिकाणी असून, त्याची शाखा: राधानगरी, येथे आहे. यातील फिर्यादी बँकेने मॅनेजर यांना दावे दाखल करणेचे व वसूलीचे अधिकार तसेच सहीचे अधिकार दिलेले आहेत. यातील आरोपी यांनी फिर्यादी बँकेकडून त्यांचे व्यवसायाकरीता कर्ज रक्कम रु.२,८०,०००/- दि.१९/११/२०२२ इ. रोजी घेतले असून, त्याची मुदत संपलेली आहे. यातील आरोपीचे खाते एन.पी.ए. मध्ये गेले असलेमुळे आरोपीकडून फिर्यादी बँकेस थकीत रक्कम रु.२,९२,०००/- इतके येणेबाकी आहे. यातील आरोपी हे फिर्यादी बँकेचे कायदेशीर देणे लागत असून, आरोपीचे बचत खातेही फिर्यादी बँकेकडे आहे. सदर देय रक्कमेपोटी यातील आरोपी यांनी फिर्यादी बँकेस दि.०१/११/२०२५इ. रोजी त्यांचे बचत खातेवरील धनादेश नं. ०४३८२०००२७ चा धनादेश दिला व थकीत रक्कम वसूल करुन घेणेस सांगीतले. आरोपीचे सांगणेवरुन फिर्यादी बँकेने आरोपीने दिलेला धनादेश वटणेकरीता फिर्यादी बँकेमध्ये भरला असता, तो दि. ०१/११/२०२५ इ. रोजी अनादर झाला. त्याची नोटीस दि.२७/११/२०२५ इ. रोजी आरोपीस पाठविली असता, आरोपीने सदर नोटीस दि.०३/१२/२०२५ इ. रोजी स्विकारुनसुध्दा फिर्यादी बँकेची देय रक्कम बँकेत जमा केली नाही. त्यामुळे आरोपीने N.I. Act १३८ प्रमाणे गुन्हा केलेला

Assistant Suprintendent

आहे. त्यामुळे आरोपीस जास्तीत जास्त कडक शासन व्हावे व धनादेशामध्ये नमूद केलेल्या रकमेच्या दुप्पट दंड आरोपीस करणेत यावा व सदर दंडाची रक्कम फिर्यादी यांना मे. कोर्टामार्फत मिळावी.

वरील व्हेरिफिकेशनमधील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केले व्हेरिफिकेशन. राधानगरी, दि.०९/०१/२०२६

समोर

फिर्यादी

STATE BANK OF INDIA
Radhanagari
11433
Branch Radh...

J.M.F.C.
Radhanagari

Solemnly Affirmed before me by
Shri./Smt. Akshay Dattatram Padji
Age 31 Occu. Service
R. Radhanagari, Tal. Radhanagari
Who identified by Shri./Smt. K. D. Vankudri
Adv. / We ... know personally
Dated 9/1/2026

Assistant Superintendent